जलसंपदा प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी प्रकल्पांच्या व्याप्तीमधील बदला संदर्भातील मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांकः मजनिप्रा-२०११/(२४/२०११)/जसं(आस्था)

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: १० जून, २०१३

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०९९/(१२६/९९)/मोप्र(प्र.), दिनांक १८ मे,१९९९.

२) शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२००९/४६५/२००९,मोप्र-२, दिनांक १५ जानेवारी,२०१०.

३) शासन पत्र क्रमांकः मजनिप्रा-२०११//(२४/२०११)/जसं/आस्था, दिनांक २९-४-२०११

४) शासन पत्र क्रमांकः शासन परिपत्रक क्रमांक सुप्रमा/०४११/(२६२/२०११)/मोप्र-१, दिनांक १०-८-२०११.

५) शासन परिपत्रक क्रमांक मजानिप्रा-२०११/(२४/२०११)/जसं/आस्था, दिनांक २१-९-२०११.

<u>प्रस्तावना —</u>

राज्यातील बांधकामाधीन प्रकल्पांवर स्थानिक मागण्या विचारात घेवून काही बदल करावे लागतात. त्यात कालव्याची लांबी वाढविणे, पाणीसाठा वाढविणे, कालव्याला अस्तरीकरण करणे, उपसा सिंचन योजनेचा समावेश करणे, कालव्याऐवजी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे घेणे, बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतर करणे, सिंचन पध्दतीमध्ये बदल करणे (सूक्ष्म किंवा बंद पाईपलाईनद्वारे) इ. बदलाचा प्रामुख्याने समावेश होतो.

मा.राज्यपालांनी राज्यातील बांधकामाधीन प्रकल्पांची उर्वरित किंमत व उपलब्ध होणारा निधी याचा विचार करुन राज्यात नवीन प्रकल्प घेण्यावर निर्बंध आणले आहेत. अशा परिस्थितीत बांधकामाधीन

प्रकल्पाच्या व्याप्तीत मोठा बदल केल्यास नवीन प्रकल्प हाती घेतल्यासारखे होत असल्याने मा.राज्यपाल यांनी दि. १७ मार्च, २०१२ रोजीच्या निदेशामधील परिच्छेद १८(ई) मध्ये खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

"असे निदर्शनास आले आहे की, प्रगतीपथावर असलेल्या काही प्रकल्पांमध्ये " व्याप्तीतील बदल " यांमुळे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येते. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने असे निदर्शनास आणले आहे की, ही बाब नवीन प्रकल्पाला मंजूरी दिल्या सारखी होईल. जे की या पूर्वीच्या तसेच वर उल्लेखिलेल्या राज्यपाल यांच्या निदेशांना अनुसरुन नाही. त्यामुळे, जलसंपदा विभागाने चालू प्रकल्पांच्या " व्याप्तीतील " बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करावीत. ही मार्गदर्शक तत्वे वित्त विभाग, नियोजन विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या सल्ल्याने ठरविण्यात यावीत."

जलसंपदा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे (State Level Technical Advisory Committee) तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे (मजनिप्रा) सादर करण्यात येत असलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दत शासनाच्या संदर्भातील पत्र क्रमांक ३ मध्ये नमूद करण्यात आली होती. मा.राज्यपालांचे निदेश विचारात घेवून व्याप्तीतील बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय—

### १. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रकल्पांच्या व्याप्तीतील बदल.

१.१ केंद्रीय जलआयोग, नवी दिल्ली यांनी सन १९८० मध्ये जलसंपदा प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रकल्प अंदाजपत्रकातील तरतुदी हया (अ) प्रमुख व शाखा कालवे यांचेबाबत सविस्तर सर्वेक्षण, (ब) वितरण व्यवस्थेबाबत १० टक्के लाभक्षेत्राचे सविस्तर सर्वेक्षण,

असे सर्वेक्षण करुन त्याचे नमुना उपअंदाजपत्रक तयार करुन यावर आधारित असाव्यात, असे नमूद केले आहे. त्यानुसार प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रके मूळ प्रशासकीय मान्यतेसाठी तयार केली जातात. प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर बांधकामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेऊन टप्प्याटप्प्याने उर्वरित लाभक्षेत्राचे सविस्तर सर्वेक्षण करण्यात येते. त्यामुळे मूळ प्रकल्प अहवालातील लाभक्षेत्रात सुमारे १० ते २० टक्के पर्यंत वाढ किंवा घट अपेक्षित असते.

१.२ पाटबंधारे प्रकल्पाच्या अद्ययावत प्रशासकीय मान्यताप्राप्त अहवालामध्ये बदल करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावात खालील पैकी कोणताही एक किंवा अनेक बदल प्रस्तावित असल्यास त्या प्रकल्पाच्या भौतीक/आर्थिक व्याप्तीमधील बदल झाला असे समजण्यात येईल :-

अ. प्रकल्पाचा पाणीसाठा, पाण्याचा वापर (water use), पीक रचना, पाणी वाटप (Water Allocation) व मुख्य कालव्यांची संरेखा व लांबी इत्यादी बाबींच्या बदलांमुळे मोठे, मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्पांकरिता मूळ सिंचनाखालील लाभक्षेत्रात (ICA) १० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त वाढ होणार असल्यास,

ब. प्रकल्पातील धरणांच्या नियंत्रक पातळया (Controlling Level), क्षेत्रफळ-क्षमता आलेख (Area Capacity Curve) इत्यादि बाबींच्या बदलांमुळे प्रकल्पातील धरणांच्या प्रकल्पिय उपयुक्त पाणीसाठयांमध्ये (Live Storage) १ (एक) टक्का किंवा त्यापेक्षा जास्त वाढ होत असल्यास,

२. <u>व्याप्तीत बदल असलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव</u>

२.१ ज्या प्रकल्पाच्या व्याप्तीत या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१.२ प्रमाणे बदल आहेत आणि त्याचबरोबर त्या प्रकल्पांना राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या सहमतीची आवश्यकता आहे, अशा प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव पाटबंधारे विकास महामंडळानी प्रथम राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे तांत्रिक व आर्थिकदृष्टया छाननी

करुन सहमतीसाठी (Techno-economical scrutiny and clearance) पाठवावेत. त्यानंतर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी व सहमतीसह सदर प्रस्ताव पाटबंधारे विकास महामंडळानी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे मजनिप्रा अधिनियम, २००५ मधील कलम ११(च) अंतर्गत आढावा व मान्यतेसाठी (Review and clearance) सादर करावेत. या दोन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव महामंडळांनी राज्य शासनाकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत.

२.२ ज्या प्रकल्पांच्या व्याप्तीत या शासन निर्णय परिच्छेद क्र.१.२ प्रमाणे बदल आहेत आणि त्या प्रकल्पांना राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या सहमतीची आवश्यकता नाही, अशा प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव पाटबंधारे विकास महामंडळानी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे मजनिप्रा अधिनियम, २००५ मधील कलम ११(च) अंतर्गत आढावा व मान्यतेसाठी सादर करावेत. प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव महामंडळानी राज्य शासनाकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत.

२.३ राज्यातील पाण्याची मर्यादीत उपलब्धता विचारात घेता, जास्तीत जास्त क्षेत्र सूक्ष्म/ ठिबक सिंचनाखाली आणणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रकल्पावरील प्रवाही सिंचनाचे रुपांतर ठिबक सिंचनामध्ये केल्यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होत असल्यास स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता देण्याचे अधिकार जलसंपदा विभागाकडे राहतील.

२.४ सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी राज्यशासनाकडे सादर करण्यात आलेल्या अशा अंदाजपत्रकाबाबत वेळोवेळी निर्धारीत केलेल्या स्तरावरुन निर्णय घेण्यात यावा.

३. <u>व्याप्तीत बदल नसलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव</u>

३.१ ज्या पाटबंधारे प्रकल्पांच्या व्याप्तीत या शासन निर्णयामधीलपरिच्छेद क्र.१.२ प्रमाणे बदल नाही आणि त्या प्रकल्पांना संदर्भातील अनुक्रमांक ५ येथील शासन परिपत्रकानुसार किंवा वेळोवेळी त्यामध्ये झालेल्या बदलानुसार राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे, अशा प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव पाटबंधारे विकास

महामंडळानी प्रथम राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे तांत्रिक व आर्थिकदृष्टया छाननी करुन सहमतीसाठी (Techno-economical scrutiny and clearance) पाठवावेत. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी व सहमतीसह सदर प्रस्ताव महामंडळानी राज्य शासनाकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत.

३.२ ज्या प्रकल्पाच्या व्याप्तीत या शासन निर्णयामधील परिच्छेद १.२ प्रमाणे बदल नाही आणि त्याचबरोबर त्या प्रकल्पांना संदर्भातील अनुक्रमांक ५ येथील शासन परिपत्रकानुसार किंवा त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या बदलानुसार राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या सहमतीची आवश्यकता नाही, अशा प्रकल्पांचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव पाटबंधारे विकास महामंडळानी थेट राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावेत.

३.३ वरील परिच्छेद क्र. ३.१ व ३.२ मध्ये नमूद केलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव पुर्वीप्रमाणेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्याची आवश्यकता नाही.

३.४ शासनाकडे सादर करण्यात आलेल्या अशा प्रकल्पांचे सुधारीत अंदाजपत्रकाबाबत जलसंपदा विभागाने प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी.

४. सर्वसाधारण सूचना

४.१ प्रकल्पांचे बांधकाम (Execution) हे मूळ प्रशासकीय मान्यता किंवा अद्ययावत सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्पांच्या प्रमुख वैशिष्टयांशी अनुरुप असावे. तथापि धरणाची उंची वाढविणे, कालव्याची लांबी वाढविणे, स्पीलवे गेट्सना फ्लॅप लावून जलाशय पातळीमध्ये वाढ करणे, कालवे व वितरण व्यवस्थेत अस्तरीकरण करणे, उपसा सिंचन योजनेचा नव्याने समावेश करणे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/बॅरेजेस् योजनेचा नव्याने समावेश करणे अथवा कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांचे बॅरेजेस् मध्ये रुपांतर करणे, सिंचन पध्दतीमध्ये बदल (प्रवाही, उपसा, सूक्ष्म, बंद पाईपव्दारे इ.), अधिसूचित लाभक्षेत्रामध्ये बदल करणे इत्यादी कामे प्रकल्प अधिकाऱ्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता घेतल्याखेरीज हाती घेऊ नयेत. यासंदर्भात शासन परिपत्रक

क्र.संकीर्ण-२००९/(४६५/२००९)/मोप्र-२, दि. १५ जानेवारी, २०१० (पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांची प्राक्कलने/सुधारित प्रशासकीय मान्यतेची प्राक्कलने तयार करताना विचारात घ्यावयाच्या बाबी) अन्वये दिलेल्या निर्देशाचेही काटेकोरपणे पालन करावे.

४.२ संदर्भ ४ येथील शासन परिपत्रकानुसार प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दोन टप्प्यात देणे आवश्यक आहे. प्रशासकीय मान्यतेच्या वेळी बऱ्याचदा ढोबळमानाने प्राथमिक सर्वेक्षण करुन प्रकल्प मंजूर केला जातो व त्यात पुढे सविस्तर सर्वेक्षणाअंती बदल होतात. असे प्रकार घडू नयेत म्हणून प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी आवश्यक ते विस्तृत सर्वेक्षण व अन्वेषण करण्यात यावे. या सर्वेक्षण अन्वेषणासाठी अंदाजपत्रक तयार करुन, सदर खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रथमतः प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात यावी. सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या आधारे प्रकल्पाचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करुन प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेचा निर्णय घेण्यात यावा. तसेच प्रकल्पांकरिता आवश्यक जमिनी ताब्यात मिळाल्याशिवाय त्यावरील कामांकरिता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येवू नये. तसेच जमिनी ताब्यात मिळाल्याशिवाय त्यावरील प्रकल्पाच्या कोणत्याही दायित्वास मान्यता देण्यात येवू नये असेही वरील परिपत्रकात नमूद केले आहे. त्याचे काटेकोरपणे पालन करावे. प्रकल्पाच्या कालव्याच्या कामांच्या निविदा धरणापासून सुरु करुन सलगपणे काढण्यात याव्यात. तथापि , पुर्नवसन, कालवा, वितरण यासाठी जमिन संपादन करण्यास विलंब लागत असल्यास, तसेच धरणासाठी आवश्यक असलेली जमिन पूर्णपणे संपादित झालेली असल्यास व जमिनीचा ताबा मिळाला असल्यास फक्त शीर्ष कामे ( Head Works ) प्रारंभ करण्याबाबत योग्य त्या समर्थनासह प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

४.३ ज्या प्रकल्पांवर मूळ प्रशासकीय मान्यता मिळल्यानंतर ५ वर्षात १० टक्के किंवा त्यापेक्षा कमी खर्च झालेला आहे अशा प्रकल्पांच्या बाबतीत सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतल्याशिवाय त्या प्रकल्पावर पुढील खर्च करु नये.

४.४ प्रकल्पाची बहुतांश कामे मंजूर प्र.मा. किंमतीत पूर्ण न होता प्रत्यक्ष काम पूर्ण होताना त्यामध्ये वाढ होते. अशा प्रकल्पांच्या सुधारित प्र.मा.च्या प्रस्तावामध्ये ज्या कारणांमुळे वाढ होते त्या बाबी टाळण्याकरिता तसेच कार्यनिहाय संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी शासन परिपत्रक जलसंपदा विभाग क्रमांक संकीर्ण-२००९/४६५/२००९/मोप्र-२ दिनांक १५/१/२०१० अन्वये निर्गमित केलेल्या सूचना येथे पुनरुधृत करण्यात येत असून त्यांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

५. हा शासन निर्णय व्याप्तीतील बदल असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांच्या सु.प्र.मा.च्या संदर्भात सध्या प्रचलीत असलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके/आदेश हे अधिक्रमित करुन नियोजन विभाग, वित्त विभाग व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. उपरोक्त मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.,

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६१०२०२६३४४६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Haribhau Anandrao Dhangare

Digitally signed by Haribhau Anandrao Dhangare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Haribhau Anandrao Dhangare
Date: 2013.06.10 15:01:42 +05'30'

(ह. आ. ढंगारे)
मुख्य अभियंता (ज.सं) व सह सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव,

३. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,
४. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा.मुख्य सचिव,
६. मा. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (जलसंधारण), ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (जसं) / प्रधान सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
११. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा, नाशिक.
१२. महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
१३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
१४. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
१५. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
१६. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
१७. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
१८. मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक
१९. मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधनी, नाशिक.
२०. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद.
२१. मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक.
२२. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाक्षेवि, औरंगाबाद.
२३. मुख्य अभियंता, जलविकास केंद्र, वाल्मी परिसर, औरंगाबाद.
२४. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर.
२५. मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर.
२६. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती

२७. मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, अमरावती

२८. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.

२९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे.

३०. मुख्य अभियंता, (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे.

३१. मुख्य अभियंता, (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प, पुणे.

३२. मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प (विद्युत) मुंबई.

३३. मुख्य अभियंता, यांत्रिकी संघटना नाशिक.

३४. मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुबई.

३५. मुख्य अभियंता, ल.पा (स्थानिक स्तर), येरवडा, पुणे.

३६. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३७. सहसचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३८. सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३९. जसं(आस्था) कार्यासन, संग्रहार्थ.